वेस्ट इंडिजविरुद्ध पंत, हार्दिक बाहेरच; नबी, नमन एकदिवसीय संघात

नितीश कुमारची अनपेक्षित वर्णी

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

एकदिवसीय संघ : शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, ऋतुराज गायकवाड, केएल राहुल (उपकर्णधार, यष्टीरक्षक), ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), नितीश कुमार रेड्डी, रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, प्रसिध कृष्णा, गुरनूर ब्रार, मोहम्मद सिराज, अकिब नबी, यशस्वी जैस्वाल, नमन धीर.

ट्वेन्टी-२० संघ : श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, वैभव सूर्यवंशी, इशान किशन (यष्टीरक्षक), संजू सॅमसन (यष्टीरक्षक), तिलक वर्मा (उपकर्णधार), शिवम दुबे, कुलदीप यादव, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, रवी बिश्नोई, नितीश कुमार रेड्डी, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, मयांक यादव

शेष भारत संघ : ऋषभ पंत (कर्णधार, यष्टीरक्षक), सनत सांगवान, शिखर मोहन, सुदीप घरामी, सर्फराज खान (उपकर्णधार), स्मरण रवीचंद्रन, मानव सुथार, सारांश जैन, आकाश दीप*, मुकेश कुमार, मुकेश चौधरी, आर्यन जुयाल (यष्टीरक्षक), आर्यन पांडे, अनुकूल रॉय, आयुष दोसेजा (* तंदुरुस्तीवर निवड अवलंबून)

वेस्ट इंडिजविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी अष्टपैलू खेळाडूची उणीव भरून काढताना भारतीय निवड समितीने आशियाई स्पर्धेसाठी निवडलेल्या नितीश कुमार रेड्डीची संघात वर्णी लावली आहे. त्याच वेळी हार्दिक पंड्या आणि ऋषभ पंत यांच्या पुनरागमनाची प्रतीक्षा देखील लांबली आहे.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेतून हार्दिक आणि पंत यांच्या पुनरागमनाचा अंदाज बांधला जात होता. मात्र, अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने संघ जाहीर करताना दोघांनाही या मालिकेसाठी पात्र धरले नाही. संघातील अष्टपैलू खेळाडूची उणीव भरुन काढण्यासाठी निवड समितीने नितीश कुमार रेड्डीचे आशियाई संघातील नाव मागे घेत त्याची एकदिवसीय संघात वर्णी लावली.

पंजाबचा नवोदित अष्टपैलू खेळाडू नमन धीर आणि जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज अकिब नबी यांना वेस्ट इंडिजविरुद्धच्या आगामी एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघात पहिल्यांदाच स्थान मिळाले आहे. पंड्या आणि पंतला वेगवेगळ्या कारणांसाठी वगळण्यात आले. अर्थात, पंतकडे इराणी चषकासाठी शेष भारत संघाचे कर्णधारपद सोपविण्याचा अपेक्षित निर्णय घेतला. एकदिवसीय संघाचे कर्णधारपद शुभमन गिलकडे कायम ठेवण्यात आले आहे. तर, केएल राहुल उपकर्णधार असेल.

हार्दिक २० सप्टेंबरपर्यंत पूर्णपणे तंदुरुस्त होईल असे मानले जात असले, तरी जोपर्यंत तो भारत 'अ' कडून खेळताना १० षटके गोलंदाजी करू शकतो हे सिद्ध करत नाही, तोपर्यंत त्याची निवड करणार नाही, असे निवड समितीने स्पष्ट केले. अनुभवी अष्टपैलू रवींद्र जडेजा याचेही एकदिवसीय संघात पुनरागमन झाले आहे. त्यामुळे या मालिकेतून निवड समितीला जडेजासारख्या अनुभवी खेळाडूच्या पुनरागमनासह नवीन चेहऱ्यांची क्षमता चाचपण्याची उत्तम संधी देईल.

आशियाई स्पर्धेसाठी जायबंदी वरुण चक्रवर्तीच्या जागी विप्रज निगमची निवड करण्यात आली. त्यामुळे वेस्ट इंडिजविरुद्धच्या एकदिवसीय आणि ट्वेन्टी-२० सामन्यांच्या मालिकेतील संघात कुलदीप यादव, रवींद्र जडेजा आणि अक्षर पटेल यांना स्थान मिळाले. महाराष्ट्राच्या ऋतुराज गायकवाडला या मालिकेसाठी केवळ एकदिवसीय संघात स्थान मिळाले आहे.

वेस्ट इंडिजविरुद्ध आधी एकदिवसीय सामन्यांची मालिका होईल. त्यानंतर पाच ट्वेन्टी-२० सामन्यांची मालिका होईल. आशियाई स्पर्धा ३ ऑक्टोबर रोजी संपत आहे. त्यानंतर सहा ऑक्टोबरला वेस्ट इंडिजविरुद्धचा पहिला ट्वेन्टी-२० सामना होणार आहे. या मालिकेसाठी आशियाई स्पर्धेतील संघात फारसे बदल करण्यात आलेले नाहीत. आशियाई संघातील यश ठाकूर आणि विप्रज निगम यांच्या जागी मयांक यादव आणि प्रिन्स यादव यांचा समावेश करण्यात आला आहे.

सूर्यवंशी अंतिम अकरामध्ये?

नवी दिल्ली : पहिले दोन सामने जिंकत मालिकेत विजयी आघाडी घेणारा भारतीय संघ अफगाणिस्तानविरुद्ध आज, गुरुवारी तिसऱ्या आणि अखेरच्या ट्वेन्टी-२० सामन्यांत निर्भेळ यशाच्या इराद्याने मैदानात उतरेल. या लढतीत युवा खेळाडू वैभव सूर्यवंशीला संधी मिळण्याची शक्यता आहे.

भारतीय संघाने पहिल्या दोन सामन्यांत चमकदार कामगिरी केली आणि अफगाणिस्तानला प्रत्येक विभागात मागे टाकले. तिसऱ्या लढतीत संघ सयोजनात बदल होऊ शकते. जेणेकरून सर्व खेळाडूंना १९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी जपानला रवाना होण्यापूर्वी पुरेसा सराव मिळेल, असे कर्णधार श्रेयस अय्यर दुसऱ्या लढतीनंतर म्हणाला होता. सूर्यवंशीने जुलैमध्ये इंग्लंड दौऱ्यावर पदार्पण केले, कारण तेव्हा संजू सॅमसन लयीत नव्हता. आता अभिषेक शर्मा आणि सॅमसन दोघेही चांगल्या लयीत आहेत. हे दोन्ही खेळाडू या प्रारूपात नियमितपणे खेळतात. त्यामुळे सूर्यवंशी संधी देण्याचा निर्णय संघ व्यवस्थापनावर असेल. इशान किशनला विश्रांती देऊन सूर्यवंशीला अंतिम अकरामध्ये स्थान देण्याचा पर्यायही उपलब्ध आहे.

- **वेळ :** सायं. ७.३० वा.
- **थेट प्रक्षेपण :** सोनी स्पोर्ट्स टेन ३.

भारतीय खेळाडूंपुढे अडचणींचे आव्हान

पीटीआय, नागोया (जपान)

आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी दाखल झाल्यानंतर राहण्याच्या व्यवस्थेची प्रतीक्षा करताना भारतीय खेळाडू.

तीन दिवासांवर येऊन ठेपलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय खेळाडूंच्या आगमनास सुरुवात झाली आहे. भारताचे वुशू, टेबल टेनिस आणि बॅडमिंटनपटू बुधवारी दाखल झाले असून, नोंदणी प्रक्रिया आणि राहण्याच्या व्यवस्थेमधील काही किरकोळ अडचणींचा सामना या खेळाडूंना करावा लागल्याचे समोर आले आहे.

नावेच गायब

दोन प्रशिक्षकांसह आलेल्या वुशू खेळाच्या सात सदस्यीय भारतीय संघाला अडचणींचा सामना करावा लागला. भारतीय खेळाडूंची राहण्याची व्यवस्था नागोया बंदरावर उभ्या असलेल्या अलिशान जहाजावर करण्यात आली आहे. खेळाडूंच्या नोंदणी प्रक्रियेत एका खेळाडू आणि दोन प्रशिक्षकांचे नाव सापडत नसल्याचे समोर आले. पाठोपाठ टेबल टेनिस संघालाही अशाच काहीशा अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या (आयओए) अधिकाऱ्याने संध्याकाळपर्यंत सर्व भारतीय खेळाडूंची व्यवस्था सुरळीत झाली असून, जहाजावर त्यांना त्यांच्या जागा मिळाल्या असल्याचे सांगितले.

क्रीडानगरीची परंपरा मोडीत

या स्पर्धेसाठी एकूण सतरा हजार खेळाडू आणि अधिकारी नागोया शहरात येणार आहेत. यामध्ये भारताचे ५०१ खेळाडू आणि २६५ अधिकारी असणार आहेत. या सर्वांसाठी तीन प्रकारे राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यात जहाज, कंटेनर आणि हॉटेल्स यांचा समावेश आहे. यामुळे आतापर्यंत अशा बहुविध खेळांच्या स्पर्धेसाठी सर्व देशातील खेळाडूंना एकत्र आणणारी क्रीडानगरीची परंपरा या स्पर्धेने मोडीत निघणार आहे. सर्व खेळाडू वेगवेगळ्या ठिकाणी राहणार आहेत. नागोया बंदरावर उभ्या असलेल्या या जहाजांवर सुमारे चार ते पाच हजार खेळाडू राहतील. यात भारतीय खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. नागोया बे येथील गार्डन पिअर येथे सुमारे दोन हजार खेळाडूंसाठी कंटेनरचे खोल्यांमध्ये रुपांतर करण्यात आले आहे. या खोल्या लहान असल्याचा आक्षेप दक्षिण कोरिया संघाने घेतला आहे, तर आशियाई क्रिकेट परिषदेने याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. बहुतांश खेळाडू आणि अधिकारी स्पर्धा केंद्रांजवळील व्यावसायिक हॉटेल्समध्ये राहणार आहेत. जलतरण स्पर्धा टोक्यो येथे होणार असल्यामळे तेथील हॉटेल्स खेळाडूंसाठी आरक्षित करण्यात आली आहेत. भारतीय संघाचे उपपथक प्रमुख अंचता शरथ कमाल यांनी परिस्थिती नियंत्रणात असून, खेळाडूंना त्यांच्या खोल्या मिळण्यास सुरुवात झाली आहे. फारशी अडचण नाही, असे सांगितले.

तक्रारी सुरूच

अधिकारी पातळीवर व्यवस्था सुरळीत होत असल्याचे सांगितले जात असले, तरी खेळाडू खाजगीत तक्रारी करतच आहेत. रोइंग संघातील खेळाडूंनी येथे आल्यापासून आम्हाला अजून खायला काही मिळाले नसल्याचे सांगितले. घरुन आणलेल्या खाण्यावरच आतापर्यंत दिवस ढकलला आहे. आम्ही एकवेळ अन्नाशिवाय राहू शकतो, पण आम्हाला विश्रांतीची नितांत गरज असल्याचे या खेळाडूंनी सांगितले. केवळ भारतीय संघच नाही, तर व्हिएतनाम, चीन, कोरिया आणि थायलंडचे खेळाडूही या अव्यवस्थेमुळे अडचणीत आहेत. अडकलेल्या एका खेळाडूने दिलेल्या माहितीनुसार, कोणतीही तात्पुरती व्यवस्था नसल्यामुळे, प्रतीक्षा करावी लागलेल्या बहुतांश खेळाडूंनी जमिनीवरच झोपणे पसंत केले आहे.

चॅम्पियन्स करंडक स्पर्धेचे केंद्र बदलण्यास 'हॉकी इंडिया'चा नकार

लाहोर : भारत आणि पाकिस्तान देशांमधील संवेदनशील द्विपक्षीय संबंध आणि सुरक्षेचे कारण देत पाकिस्तानने भारतात होणाऱ्या आगामी चॅम्पियन्स करंडक हॉकी स्पर्धेचे केंद्र बदलण्याची केलेली विनंती 'हॉकी इंडिया'ने फेटाळून लावली आहे.

ही स्पर्धा २७ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर दरम्यान पंजाबमध्ये मोहाली आणि जालंधर येथे आयोजित करण्यात आली आहे. या आगामी स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान व्यतिरिक्त मलेशिया, चीन, जपान आणि दक्षिण कोरिया हे संघ सहभागी होत आहेत.

पाकिस्तानने ही स्पर्धा तटस्थ केंद्रावर खेळविण्याची विनंती आशियाई हॉकी महासंघाकडे केली होती. मात्र, आयोजक हॉकी इंडियाचे सरचिटणीस आणि आशियाई हॉकी महासंघाचे उपाध्यक्ष भोलानाथ सिंह यांनी स्पष्ट शब्दात ही विनंती फेटाळून लावली आहे. अशा प्रकारच्या कोणत्याही विनंतीचा विचार केला जाणार नाही आणि ठिकाणात कोणताही बदल होणार नाही. पाकिस्तानने यापूर्वीही असे केले आहे. जर त्यांना आशियाई चॅम्पियन्स करंडक स्पर्धेत खेळायचे असेल, तर त्यांना भारतातच यावे लागेल, असे भोलानाथ सिंह म्हणाले.

पाकिस्तानने आपल्या भूमिकेवर ठाम राहत स्पर्धेतून माघार घेतली, तर त्यांच्या जागी बांगलादेश किंवा ओमान या संघांना समाविष्ट केले जाऊ शकते, असेही सिंग यांनी स्पष्ट केले.

खेळाडू आणि अधिकाऱ्यांना सुरक्षित, सन्मानजनक आणि अनुकूल वातावरण मिळावे यासाठी संपूर्ण स्पर्धा किंवा किमान पाकिस्तानचे सामने तटस्थ ठिकाणी हलवण्याचा प्रस्ताव आशियाई महासंघाकडे पाठवण्यात आला होता. आम्ही मैदानात भारत किंवा इतर कोणत्याही देशाचा सामना करण्यास तयार आहोत. खेळाला राजकारणापासून दूर ठेवण्याच्या तत्त्वाशी आम्ही बांधील आहोत, असे पाकिस्तान हॉकी महासंघाचे अंतरिम अध्यक्ष मोहिउद्दीन अहमद वानी यांनी सांगितले.

स्पर्धा खेळविली जाणाऱ्या पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी बहुराष्ट्रीय स्पर्धेत पाकिस्तानशी खेळण्यास हरकत नसल्यामुळे पाकिस्तान या स्पर्धेत खेळेल, असे म्हटले होते. मात्र, पाकिस्तान हॉकी महासंघाने या संदर्भात अजून सरकारकडून मंजुरी आली नसल्याचे म्हटले होते. पाकिस्तानने यापूर्वी तामिळनाडूतील कनिष्ठ विश्वचषक आणि आशिया चषक स्पर्धेतूनही माघार घेतली होती.

महिला प्रीमियर लीग १४ जानेवारीपासून

कोची येथे ऑक्टोबरच्या अखेरीस लिलाव

नवी दिल्ली : महिला क्रिकेटपटूंना प्रसिद्धी आणि वैभव मिळवून देणारा महिला प्रीमियर लीगचा (डब्ल्यूपीएल) पाचवा हंगाम १४ जानेवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान पार पडणार असल्याची घोषणा भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) बुधवारी केली. या हंगामासाठी खेळाडूंचा लिलाव कोची येथे २८ ऑक्टोबरला होईल. स्पर्धेचा कालावधी निश्चित झाला असला, तरी स्पर्धेचे आयोजन कोणत्या शहरांत होणार याची माहिती 'बीसीसीआय'ने दिलेली नाही.

नव्या हंगामासाठी कायम ठेवण्यात येणाऱ्या खेळाडूंची यादी पाचही फ्रँचायझींना २८ सप्टेंबरपर्यंत सादर करावी लागणार आहे. यानंतर सर्व फ्रँचायझी लिलावातून आपला संघ पूर्ण करतील. या लीगने जागतिक महिला क्रिकेटमध्ये स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. यामुळे भारत आणि जगभरातील प्रमुख खेळाडूंना एकत्रित खेळण्याची संधी मिळत आहे.

'आयपीएल'चा लिलाव पुन्हा भारतात ?

इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) २०२७ मधील हंगामासाठी खेळाडूंचा लिलाव भारतातच आयोजित करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे 'आयपीएल'चे अध्यक्ष अरुण धुमल म्हणाले. गेल्या तीन हंगामासाठी लिलाव प्रक्रिया दुबई, जेद्दा आणि अबू धाबी येथे पार पडली होती. 'आयपीएल' लिलावाचा कालावधी सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात असतो. या महिन्यात भारतात लग्नसराईमुळे योग्य जागा मिळत नाही. यंदाचा लिलाव हा छोट्या स्वरुपात असल्यामुळे तो भारतात व्हावा अशी आमची तीव्र इच्छा आहे, असे धुमल म्हणाले.

मेसी अर्जेंटिनाकडून खेळणार निरोपाची लढत

ब्यूनॉस आयर्स : तारांकित खेळाडू लिओनेल मेसीने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली असली, तरीही तो सहा ऑक्टोबरला अर्जेंटिनाकडून निरोपाचा सामना खेळू शकतो. क्लबस्तरावर इंटर मियामीकडून खेळणाऱ्या मेसीचा समावेश आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामन्यासाठी २८ सदस्यीय अर्जेंटिना संघात करण्यात आला आहे. मेसीकडून संघात सहभागी होणार की नाही हे स्पष्ट नसले, तरीही अर्जेंटिना फुटबॉल प्रमुखांनी मेसीने सहा ऑक्टोबरला ब्यूनॉस आयर्स येथे बेनिन संघाविरुद्ध होणाऱ्या सामन्याचे निमंत्रण स्वीकारल्याचे म्हटले आहे.

''वरिष्ठ राष्ट्रीय संघाचे प्रशिक्षक लिओनेल स्कालोनी यांसह चर्चा केल्यानंतर जगातील सर्वश्रेष्ठ खेळाडू, आमचा कर्णधार लिओनेल मेसीला आमंत्रित करण्याचा निर्णय घेतला आहे. जेणेकरून सहा ऑक्टोबरला त्याला निरोप देता येईल,'' असे अर्जेंटिना फुटबॉल महासंघाचे अध्यक्ष क्लाऊडियो तापियाने सांगितले.

भारतीय पुरुष, महिला संघांचे विजय

समरकंद (उझबेकिस्तान) : जगज्जेता दोम्माराजू गुकेश, निहाल सरीन आणि विदित गुजराथी यांनी चमकदार कामगिरी केल्याने भारतीय पुरुष संघाने ४६व्या ऑलिम्पियाड बुद्धिबळ स्पर्धेमध्ये आपल्या मोहिमेची थायलंडविरुद्ध ३-१ अशी विजयी सुरुवात केली. भारताला निर्भेळ यश संपादन करण्याची संधी होती. मात्र, अखेरच्या क्षणी केलेल्या चुकांमुळे अर्जुन एरिगेसीला पराभूत व्हावे लागले.

निहालने थानाडोन कुलप्रुएथानोनला नमवित भारताला पहिला गुण मिळवून दिला. यानंतर गुकेशने फारिस राशिद अलरियामीला पराभूत केले. गुजराथीने तुपफा खुम्सोरकाएवविरुद्ध विजय मिळवला. एरिगेसी पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना प्रिन लाओहाविरापापविरुद्ध चांगल्या स्थितीत होता. मात्र, सहा तासाहून अधिक काळ चाललेल्या या मॅरेथॉन लढतीच्या अखेरच्या टप्प्यात एरिगेसीला पराभूत व्हावे लागले. २० वर्षीय लाओहाविरापापने वेळेची कमतरता असूनही धैर्याने खेळताना अर्जुनच्या चुकीचा फायदा उचलत विजय नोंदवला.

भारतीय महिला संघानेही चांगली सुरुवात करताना डॉमिनिकन रिपब्लिकला ४-० अशा फरकाने पराभूत केले. भारताच्या अग्रमानांकित कोनेरू हम्पीने पांढऱ्या मोहऱ्यांसह फ्रांचेस्का रामिरेज लूजोनला नमवित विजयाने सुरुवात केली. आर. वैशालीने मिगुएलीना डे ला रोजा मार्टिनेजविरुद्ध सहज विजय मिळविला. वंतिका अग्रवालला मेरी लोली गोंजालेज पेगुएरोविरुद्ध विजय मिळवताना मेहनत घ्यावी लागली. तर, बी. सविता श्री हिने ऑलिम्पियाडमध्ये पदार्पणातच चुणूक दाखवली. तिने कार्ला म्या नुनेज डियाज नमविले.

फुटबॉलपटू जेम्स रॉड्रिगेझची निवृत्ती

बोगोटा (कोलंबिया) : कोलंबियाच्या फुटबॉल इतिहासातील सर्वांत प्रतिभावान फुटबॉलपटू जेम्स रॉड्रिगेझने समाजमाध्यमावरुन आंतरराष्ट्रीय स्तरावरुन निवृत्त होण्याच्या निर्णयाची घोषणा करताना आपल्या १५ वर्षांच्या कारकीर्दीला पूर्णविराम दिला.

राष्ट्रीय संघातून बाहेर पडण्याचा निर्णय घेणारा रॉड्रिगेझ आता कोलंबियातील ॲटलेटिको नॅशनल या क्लबशी करारबद्ध झाला आहे. अनेक वर्षे, सामन्यातून आनंदाचे आणि कठीण प्रसंग अनुभवल्यानंतर, आता मला राष्ट्रीय संघासोबतचा माझा प्रवास थांबवण्याची वेळ आल्याची जाणीव झाली आहे. देशाची जर्सी घालणे हे एक स्वप्न होते, पण त्याचसोबत ती एक खूप मोठी जबाबदारीही होती, असे रॉड्रिगेझ म्हणाला.

भारतात उत्तेजक सेवनाचा धोका कायम

ॲथलेटिक्स प्रशिक्षकावर आजीवन बंदी, तर पॉवरलिफ्टिंग खेळाडू निलंबित

पीटीआय, नवी दिल्ली

भारतातील उत्तेजक सेवन प्रकरणाचा धोका नुसता कायम नसून, त्याने आता गंभीर रुप धारण केल्याचे समोर आले आहे. भारतीय खेळाडूंचा गुन्हा सेवनापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर आता खेळाडू बंदी घातलेल्या औषधांच्या तस्करीत सापडू लागले आहेत.

राष्ट्रीय उत्तेजक सेवन संस्थेने (नाडा) बुधवारी जाहीर केलेल्या कारवाईत खेळाडूंनी प्रतिबंधित औषधे दिल्याबद्दल ॲथलेटिक्स प्रशिक्षक राकेश कुमार यांच्यावर आजीवन बंदी घालण्यात आली आहे. त्याचवेळी प्रतिबंधित औषधे बाळगल्याबद्दल आणि त्यांची तस्करी केल्या प्रकरणी पॉवरलिफ्टर गौरव वत्स याला तात्पुरते निलंबित करण्यात आले आहे.

या प्रकरणात राकेश कुमार यांना गेल्या वर्षी मार्चपासून निलंबित करण्यात आले होते. आता पूर्ण चौकशीनंतर त्यांच्यावरील निलंबन आजीवन बंदीत परावर्तीत करण्यात आले आहे.

पॉवरलिफ्टिंग खेळाडू गौरव वत्स हा पोषण आहाराचा व्यवसाय देखील करतो. त्याच्या कंपनीवर 'नाडा'च्या गुप्तचर आणि तपास विभागाने स्थानिक पोलिस, तसेच अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या मदतीने एप्रिल महिन्यात धाड टाकली होती तेव्हा नजफगड येथील त्याच्या कंपनीत मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित स्टेरॉइड्स जप्त करण्यात आली होती.

या छाप्यात स्नायू वाढवण्यासाठी आणि कामगिरी सुधारण्यासाठी वापरली जाणाऱ्या तब्बल २,८०० कॅप्स्युल्स/गोळ्या आणि ११ इंजेक्शन्स जप्त करण्यात आली. यामध्ये मेथेनोलोन, ट्रेनबोलोन, स्टॅनोझोलोल, मिथांडिएनोन, ऑक्सँड्रॉलोन आणि सार्म्स सारख्या जागतिक उत्तेजक द्रव्य विरोधी संस्थेने (वाडा) बंदी घातलेल्या औषधांचा समावेश होता. याशिवाय, ताकद वाढवणारे 'ॲडेनोसाइन मोनोफॉस्फेट' हे इंजेक्शनही जप्त करण्यात आले होते. या संपूर्ण रॅकेटमुळे भारतीय क्रीडा जगताला मोठा धक्का बसला आहे.

अन्य कारवाई

राष्ट्रीय आंतरराज्य स्पर्धेत कांस्यपदक जिंकणाऱ्या प्रकृती रुपा राव या महिला धावपटूच्या चाचणीत 'स्टॅनोझोलोल' आणि 'ड्रोस्टॅनोलोन' या प्रतिबंधित स्टेरॉईड्सचे अंश आढळल्याने तिला तात्पुरते निलंबित करण्यात आले आहे. खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या चेल्सीवर उत्तेजक चाचणीत अपयशी ठरल्यामुळे पाच वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय धावपटू कौशल कुमार, स्टीपलचेसपटू जुझार सिंग आणि लांब पल्ल्याची धावपटू बलजीत कौर यांच्यासह ॲथलेटिक्समधील एकूण ७ जणांचा तात्पुरत्या निलंबनाच्या यादीत समावेश आहे. एका अल्पवयीन वेटलिफ्टिंगपटूलाही 'ऑक्सँड्रॉलोन'साठी दोषी आढळल्याने निलंबित करण्यात आले आहे.

Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी: +९१-२२-३५५५ ५००० • फॅक्स: +९१-२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, सेबीचे परिपत्रक क्रमांक: सेबी/एचओ/३८/१३/११(२)२०२६-एनआयआरएसडी-पीओडी/आय/३७५०/२०२६ दिनांक ३० जानेवारी, २०२६ नुसार, कंपनीपाशी हस्तांतरण करून घेणार/दावा करणार यांचेकडून खालील तपशिलानुसार भागधारका(कां)चे नावे असलेले खाली नमूद करण्यात आलेले समभाग, त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे हस्तांतरित करण्यासाठी विनंती प्राप्त झाली आहे.

अनु. क्र.	दावा करणार/प्रस्तावित हस्तांतरण करून घेणार यांचे नाव व पत्ता	फोलिओ क्रमांक	नोंदणीकृत भागधारका(कां)चे नाव व पत्ता	प्रमाणपत्र क्रमांक	इक्विटी समभाग संख्या	विशिष्ट क्रमांक	
						पासून	पर्यंत
१	प्रमोद कुमार बी. हरलालका मनोज पॅकिंग वर्क्स, ५७३, जेएसएस रोड, चिरा बाजार, २रा मजला, मुंबई, महाराष्ट्र-४००००२	०५४४६५४८३	राजकुमार चंद्रभान अग्रवाल (HUF), अनिल चंद्रभान अग्रवाल, २४, धूतपदेश्वर, प्रसाद, ३रा मजला, २४०/४२, गिरगाव रोड, मंगल लाडी, मुंबई, महाराष्ट्र-४००००४	६६६२९८९४	८०	६८७११२०२३७	६८७११२०३१७
२	रसिला प्रदिप मेहता, प्रदिप द्वारकादास मेहता, १००३ विजय अपार्टमेंट, एम. जी. क्रॉस रोड, क्रमांक ३, बीएमसी जलतरण तलावाजवळ, कांदिवली (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र, भारत ४०००६७	०२१००१२५२	विहीर परेश मेहता, २, विजय अपार्टमेंट्स, एम. जी. क्रॉस रोड क्र. ३, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७	५००६११८८ ५९२०१०७१ ५९२०१०७२ ६२०३२२९२ ६६६७९७७३	५ १ ४ १० २०	११५५००६३६४ २५६९५८९९१ १००३९४११९ २१८२६४३६४८ ६८७७४०३३३०	११५५००६३६८ २५६९५८९९१ १००३९४१२२ २१८२६४३६५७ ६८७७४०३३४९

सदर शेअर्स संबंधित हस्तांतरणार्हो/दावेदार यांनी खरेदी केलेले/अर्जित केलेले असल्याचा दावा करण्यात आला असून, हे शेअर्स यापूर्वी हस्तांतरणासाठी सादर करण्यात आले नव्हते आणि/किंवा कंपनीकडून आक्षेपाअंतर्गत परत पाठविण्यात आले होते.

कोणत्याही व्यक्तीला/व्यक्तींना या संदर्भात काही आक्षेप असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **तीस (३०) दिवसांच्या आत** कंपनीचे रजिस्ट्रार आणि समभाग हस्तांतरण एजंट म्हणजेच **''केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड''**, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१-३२, गचीबॉवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैदराबाद – ५०० ०३२ यांच्याकडे आपला आक्षेप नोंदवावा, अन्यथा कंपनी उपरोक्त समभाग हस्तांतरित करण्याची कार्यवाही पूर्ण करेल.

स्थळ : मुंबई
दिनांक : १७.०९.२०२६

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
स्वाक्षरी/-
सावित्री पारेख
कंपनी सेक्रेटरी आणि कंप्लायन्स ऑफिसर

www.ril.com

हे पत्र वैदेही ठक्कार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. **लोकसत्ता कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३२९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्सप्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठक्कार ■ संपादक : गिरीश कुबेर * (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रुपये.